आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in




दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ७९ वा ● गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●



संपादक, दैनिक लातूर प्रभात परिवार !

## माझं लातूर परिवाराच्या वतीने ५ हजार तिरंगा ध्वजाचे मोफत वितरण

लातूर : हर घर तिरंगा अर्थात घरोघरी



तिरंगा अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. शासनाच्या या अभियानांतर्गत माझं लातूर परिवाराच्या वतीने शहरात ५ हजार तिरंगा ध्वजाचे मान्यवरांच्या हस्ते मोफत वितरण करण्यात आले.

शहरातील सर्वसामान्य नागरीकांना आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकविता यावा, देशाच्या या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होता यावे या उद्देशाने हनुमान चौक येथे सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मान्यवरांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे मोफत वितरण करण्यात आले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी कुटुंबातील महिला सदस्यांना घरावर ध्वज फडकविण्याचा मान द्यावा तसेच ध्वजासोबत सेल्फी घेऊन ु.हरीसहर्रीीळीरपसर. ले या संकेतस्थळावर अपलोड करावा असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. हनुमान चौक येथे पार पडलेल्या या अभियानात शहर वाहतूक पोलिस शाखेचे निरीक्षक गणेश कदम, माझं लातूर परिवाराचे सतिश तांदळे, अभय मिरजकर, डॉ सितम सोनवणे, गोपाळ झंवर, शिलरत्न सोनवणे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, रविंद्र गट्टानी, उत्तम लोंढे यांच्या हस्ते नागरीकांना ध्वज वितरीत करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी माझं लातूर परिवाराच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## आजादी का अमृत्त मोहोत्सव मालमत्ता करावर आकरण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये १०० टक्के सवलत

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने व वसुलीस चालना देण्याच्या दृष्टीने तसेच मालमत्ताकर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असल्याने लातूर शहर महानगरपालिकेमार्फत स्वातंत्र्य दिंनाचे औचित्य साधुन शहरवाशीयांना दिं.१५ ऑगष्ट २०२४ ते १९ ऑगष्ट २०२४ रोजी पर्यंत थकबाकीसह एकरक्कमी कर भरणा-या करदात्यास एक आनोखी भेट म्हणून शास्तीमध्ये (व्याजामध्यें) १०० टक्के माफी देण्यात येत आहे.

तरी लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताधारकांनी या सूवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा वरील देण्यात आलेल्यां मुदतीमध्ये करून लातूर शहर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे तसेच उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून नागरिकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा

मुंबई, :- भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या असून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांना, क्रांतीकारकांना, हौतात्म्य पत्करलेल्या शहिद वीरांना, अभिवादन केले आहे. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य, देशाची एकता, अखंडता, सार्वभौमता अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी वचनबद्ध होऊया, सामाजिक जाणीव, राष्ट्रीय कर्तव्य-जबाबदारीच्या भावनेतून राष्ट्रविकासात योगदान देऊया, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त केले आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्तच्या शुभेच्छा संदेशात उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणतात की, स्वातंत्र्यदिन हा आपल्यासाठी सर्वात मोठा राष्ट्रीय उत्सव आहे. हा उत्सव तितक्याच उत्साहात, आनंदात, व्यापक स्वरुपात साजरा करायचा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी सुरु केलेल्या 'हर घर तिरंगा..' अभियानाने याची सुरुवात झाली आहे.




# बहुजन नेते नागनाथ घिसेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त भोकर मध्ये आज विविध कार्यक्रमांचे आयोजन

भोकर - भोकर विधानसभा मतदारसंघाचे बहुजन नेते नागनाथराव घीसेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट २०२४ रोजी भोकर मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यांचा भव्य अभिष्टचिंतन सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

भोकर विधानसभा मतदार संघाच्या राजकारणात बहुजन विचाराचा ठसा उमटविणारे प्रस्थापितांच्या विरोधात दंड थोपटणारे सर्वसामान्यांच्या मदतीला धावणारे बहुजन नेते नागनाथराव घीसेवाड यांचा वाढदिवस १५ ऑगस्ट २०२४ रोजी भोकर येथे कै.लक्ष्मणराव घीसेवाड हायस्कूल भोकर येथे साजरा होणार आहे त्यानिमित्त सकाळी ११ वाजता नागनाथ घिसेवाड मित्र मंडळाच्या वतीने भव्य सत्कार व अभिष्टचिंतन सोहळा



साजरा करण्यात येणार आहे या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते राम चौधरी मुदखेड,डॉ.उत्तम जाधव भोकर,ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड, नगरसेवक रिझवान अर्धापूर यांची उपस्थिती राहणार आहे वाढदिवसानिमित्त सकाळी ९ वाजता ग्रामीण रुग्णालय भोकर येथे रुग्णांना फळे वाटप, मूक बधिर व अंध विद्यालय भोकर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,कै. लक्ष्मणराव घीसेवाड विद्यालय येथे वृक्षारोपण व विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा साजरा होणार आहे, उपस्थित आलेल्या सर्व कार्यकर्ते व नागरिकांना अलपोउपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.या कार्यक्रमास भोकर विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी हजर राहावे असे आवाहन नागनाथराव घीसेवाड मित्र मंडळ भोकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख' यांना विलासबाग बाभळगाव येथे जनसमुदायाच्या उपस्थितीत १२ व्या स्मृतिदिनानिमीत्त आंदराजली अर्पन

**लातूर : 'लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख' यांचा राजकीय प्रवास हा खरोखरच एक प्रेरणादायी प्रवास होता. एका सामान्य ग्रामीण भागातील तरुणाला राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रातील कॅबिनेट मंत्री बनवणारा हा प्रवास त्यांच्या कर्तृत्वाचे प्रमाण आहे. ग्रामीण भागातील जीवन जगल्यामुळे आदरणीय विलासराव देशमुख यांना शेतकरी आणि त्यांच्या समस्यांची खोलवर जाणीव होती. त्यांनी सहकाराच्या माध्यमातून ग्रामविकासाचे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले सिंचन सुविधा, कृषी यांत्रीकरण आणि कृषी पूरक उद्योगांना चालना देऊन कृषी क्षेत्राचा विकास केला. त्यांचा १२ वा स्मृतिदिन निमित्ताने बाभळगाव येथील विलासबाग येथे देशमुख कुटूंबिय, मराठवाडयासह राज्यभरातून आलेल्या विविध संस्थाचे पदाधिकारी तसेच मोठया जनसमुदायाच्या उपस्थितीत सार्वजनीक आदरांजली वाहण्यात आली.**

गुरुवार दि. १४, ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता विलासबाग, बाभळगाव येथे भावदर्पण हा कार्यक्रम सादर करण्यात आला. लातूरसह राज्यभरात यानिमीत्ताने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आदरणीय विलासराव देशमुख आणि देशमुख परिवारावर प्रेम करणारे स्नेही, मित्र, हितचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते. या



सर्वांनी स्मृती स्थळी पुष्पांजली अर्पण करून आपल्या आवडत्या नेत्याला भावपूर्ण आदरांजली वाहिली. लोकनेते विलासराव देशमुख यांना विलासबाग, बाभळगाव येथे प्रारंभी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, विलास साखर कारखाना चेअरमन वैशालीताई देशमुख, रीड लातूरच्या संस्थापीका दिपशीखा देशमुख, अभिजीत देशमुख, डॉ. सारिका देशमुख, जयसींह देशमुख यांनी आदरणीय विलासराव देशमुख यांना पुष्पांजली अर्पण केली. देशमुख कुटूंबियाकडून आदरांजली अर्पन केल्यानंतर क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, माजी आमदार त्र्यंबकराव भिसे, माजी आमदार सुधाकर भालेराव, विचारवंत उल्हासदादा पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, मुख्यकार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, निवासी जिल्हाधिकारी जळगाव विजयकुमार ढगे, अतिरीक्त पोलीस अधिक्षक अजय देवरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नरे, अविनाश कोरडे, तहसीलदार सौदागर तांदळे, आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अशोकराव पाटील निलंगेकर, जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष ड. किरण जाधव, यांनी आदरांजली अर्पन केली.

आदरणीय विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमीत्त आदरांजली अर्पण करण्यासाठी उपस्थित असलेल्या विविध् क्षेत्रातील मान्यवर, संस्थाचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष व सलग्न संघटनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक यांच्या मनात विलासराव देशमुख यांच्या भावपूर्ण आठवणी यावेळी दाटून आल्या.

या प्रसंगी सुप्रसिद्ध संगीतकार पंडित शौनक यांनी संतवाणी कार्यक्रम सादर केला त्यांना संजय हिंगणे, पंकज शिरभाने, तुकाराम आव्हाड यांनी संगीत साथ दिली, तर संगीत संयोजन तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे यांनी केले.

# शिव्या मुक्त समाज काळाची एक गरज प्रा. वनिता पाटील

लातूर, : समाजात शिव्या आणि अपशब्दांच्या वापरामुळे नकारात्मक भावना निर्माण होते. त्यामुळे शिव्या मुक्त समाज काळाची एक गरज आहे असे प्रतिपादन भौतिकशास्त्र विभागातील प्रा. वनिता पाटील यांनी केले.

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशियल वर्क एज्युकेटर्स (मास्वे), महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समाजकार्य पंधरवाडा व शिव्या मुक्त समाज अभियान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचार मंचावर समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. काशिनाथ पवार आणि प्रा. भाग्यश्री भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर



यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी शिव्या मुक्त अभियानाची शपथ देण्यात आली.

पुढे बोलताना प्रा. वनिता पाटील म्हणाल्या की, समाजात इतरांचा आदर राखणे आणि विशेषतः महिलांचा सन्मान करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्तावीक करताना समाजकार्य विभाग प्रमुख प्रा. दिनेश मौने यांनी समाजात शिव्या मुक्त वातावरण निर्माण करण्याच्या गरजेवर प्रकाश टाकला. तसेच प्रा. काशिनाथ पवार यांनीहि मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, शिव्यांचा वापर हा केवळ शब्दांचा अपमान नसून, हा समाजाच्या सांस्कृतिक मूल्यांना धक्का पोहोचवीनारी बाब आहे. अपशब्दांचा वापर न करता आदर आणि सन्मानाच्या भाषेत संवाद साधणे गरजेचे आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात शिव्या मुक्त वातावरण निर्माण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशिष स्वामी यांनी केले. तर आभार अंजली गर्जे हिने मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाजकार्य विभागातील प्रा. दता करंडे, प्रा. नागेश जाधव प्रा. प्रकाश राठोड, प्रा. मारुती माळी, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, संतोष येंचवाड आदिनी परिश्रम घेतले.

## कल्याणकारी योजनांद्वारे सर्वसामान्यांना न्याय देण्यावर भर - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, : राज्य विविध क्षेत्रात अग्रेसर असून विविध




कल्याणकारी योजनांद्वारे सर्वसामान्यांना न्याय देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे लोकशाही या वृत्तवाहिनीच्या संवाद २०२४ या कार्यक्रमात मुलाखतीत दरम्यान ते बोलत होते. लोकशाही वृत्त वाहिनीचे गणेश नायडू यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांनमध्ये सुटसुटीतपणा आणून पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळविण्यासाठी प्रक्रिया सुकर करण्यात आली आहे. राज्यातील पात्र महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली. लाभार्थी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा कमी असणाऱ्या महिलांना लाभ मिळणार आहे. उत्पन्नाचा दाखला उपलब्ध नसेल तर पिवळे व केशरी रेशनकार्ड असेल त्यांना उत्पन्नचा दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात येणार आहे. लवकरच दोन महिन्याचे पैसे बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना - २०२४ शासनाने लागू केली आहे. त्यामुळे आता ७.५ अश्र्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंपाचा वापर करणाऱ्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना या सर्व योजनांची सविस्तर माहिती यावेळी त्यांनी सांगितली. माध्यमांनी शासनाच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी जेणेकरून जनतेला त्याचा लाभ घेता येईल.

गणेशोत्सव पर्यावरण पुरक पद्धतीने व शांततेत साजरा करावे. ग्लोबल वार्मिंगचा धोका निर्माण होवू नये म्हणून सर्वांनी वृक्षारोपण करावे. बांबू लागवडीसाठी प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राज्यात मोठे उद्योग येत आहेत. त्यांच्यासाठी विविध उपक्रम सुरू करण्यात येत आहेत. मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहेत. राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. आरक्षणाबाबत शासन सकारात्मक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ प्रवेश प्रमाणपत्र उपलब्ध

मुंबई, :महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२४ रोजी नियोजित महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ करिता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील प्रवेशपात्र उमेदवारांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे आयोगाने कळविले आहे.

प्रवेशप्रमाणपत्र मिळविण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact- secretarympsc. gov.in d support-onlinempsc.gov.in या ईमेल व/अथवा ०२२६९१२३९१४ किंवा ७३०३८२१८२२ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल असे आयोगाने कळविले आहे.

## लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांना मांजरा साखर कारखान्यावर स्मृती स्थळी अभिवादन

लातूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासरावजी



देशमुख साहेब यांच्या बाराव्या स्मृतिदिनानिमित्त १४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक ७:३० वाजता विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना येथे स्मृतीस्थळी त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कारखान्याचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी अभिवादन केलेयावेळी माजी आमदार अँड त्रिंबक भिसे, जिल्हा बँकेचे माजी चेअरमन श्रीपतराव काकडे रेणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष यशवंतराव पाटील, जागृती शुगर इंडस्ट्रीजचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष श्यामभाऊ भोसले उपाध्यक्ष सचिन पाटील माझी अध्यक्ष गणपतराव बाजुळगे मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्री शैल्य उटगे, रेना साखर कारखान्याचे अध्यक्ष सर्जेराव मोरे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, विकास कारखान्याचे उपाध्यक्ष रवी काळे इंदिरा सूतगिरणीचे अध्यक्ष बाळासाहेब कदम संभाजी सुळ सचिन दाताळ यांच्या सह मांजरा साखर कारखान्याचे सन्माननीय संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, मान्यवर अधिकारी कर्मचारी कामगार उपस्थित होते.

# झरोका

एक – महाराष्ट्राचे विकासरत्न, लोकनेते विलासराव देशमूख यांचा स्मृतीदिन साजरा होत असताना कॉंग्रेस नेतृत्व कोणाकडे, कोणाचे पाठबळ कोणाला अशीच कुजबूज होते आहे त्यामूळे कांहीच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, विधानसभा निवडणूका तोंडावर आल्या आहेत त्यात महायूतीचे पारडे जड होत असल्यांचा संशय येत असल्याने मांजी मंत्री आ. अमित देशमूख हे इतराकरवी भलावण करीत असून विलासरावाच्या माध्यमातून स्वतः चे ठिकाण मजबूत करीत असावेत त्यात तूझी अडचण काय आहे.

एक – अहो, सत्ताकारणात महायूती अग्रेसर असली तरी महाराष्ट्र ही भारताची आर्थीक राजधानी आणी सत्ताकेंद्रातील उत्तरप्रदेशसह बरोबरीचे स्थान आहे मग महाराष्ट्राला अशी अवनती कशाला म्हणतोय म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, भाजपा, कॉंग्रेस, फूटीर शिवसेना, फूटीर राष्ट्रवादी कॉंग्रेस हे एकाचे माळेची मनी आहेत सत्ता येते, जाते पण ते एकजूटीचेच राजकारण, सत्ताकारण करीत असतात हे लक्ष्यात ठेव.

एक – अहो, तूम्ही शहाणे म्हणून मी मनातील शंका प्रकट करुन न्यायीक तोडगा मिळेल म्हणून मी बोलतोय पण तूमची तूतारी, बाणा वेगळाच दिसतो आहे म्हणून तूमच्याबद्दलही शंका येते आहे. मग बोला.

दुसरा – अरे, विधानसभा निवडणूक निकालानंतरच तूला काय ते कळेल याची वाट पाहात राहा एवढेच !

# काय बोलता राव ?

लाडकी बहीण योजना ही तांत्रीक घोटाळ्यात अडकली असली तरी तीत राजकीय, सत्तांकी दोष असल्याने लाडकी बहीण, भाऊ, सख्खे, सावत्र भाऊ या वादात अडकली असून पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्य दिना पूर्वीच लाडकी बहीणीच्या खात्यात पैसे जमा होतील असे भाकीत महाराष्ट्राचे उपमुख्यंमत्री तथा अर्थमंत्री ना. अजित पवार यानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेला शह देण्यासाठीची केले होते पण लाडकी बहीण, महिणेवारी दीड हजार रु. गोत्यात अडकले आहेत मग....!

## काय बोलता राव,

अरे, माझी लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यानी आखली त्यास अर्थमंत्री म्हणून अजित पवार यानी प्रारंभी खोडा घातला पण विधानसभा निवडणूका समोर आल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यानी लाडकी बहीण योजना राबविण्याचे धनूष्यबाण उचलेले असले तरी खा. सुप्रिया सुळे, पवार आणी सर्वाच्च न्यायालयाच्या तंबी मूळे लाडकी बहीण आणी महायूतीची विधानसभा निवडणूकच फेऱ्यात अडकते काय अशीच राजकीय वर्तूळात उलथापालथ होताना दिसते आहे मग तूम्हीच बोला दाजीबा !

### शिवलीच्या श्री हनुमान देवस्थानास ब दर्जा मिळवून देणार दुर्लक्षित भादा सर्कल महायुती शासनाच्या माध्यमातून विकासाच्या हायवेवर आणले दिशाभूल करणाऱ्या कॉंग्रेसवाल्यापासून सावध रहा आ. रमेशआप्पा कराड याचे आव्हान

लातूर – गेल्या पंधरा वर्षात निवडून आलेल्या तिन्ही कॉंग्रेस आमदारानी लातूर ग्रामीण मतदार संघातील भादा सर्कलचा कसलाही विकास केला नाही. राज्यातील महायुती शासनाच्या विविध योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी मिळवून देऊन दुर्लक्षित असलेल्या या भागाला खऱ्या अर्थाने विकासाच्या हायवेवर आणण्याचे काम केले आहे. येत्या काळात शिवली येथील जागृत ग्रामदैवत श्री हनुमान मंदिर देवस्थानास तीर्थक्षेत्र विकास योजनेचा 'ब' दर्जा मिळवून या मंदिर परिसराच्या सर्वांगीन विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मिळवून देऊ अशी ग्वाही देवून संभ्रम आणि दिशाभूल करणाऱ्या कॉंग्रेसवाल्या पासून जनतेनी सावध राहावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील औसा तालुक्यात असलेल्या भादा जिल्हा परिषद सर्कल मधील भाजपा पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ता संवाद मिळावा मौजे शिवली येथे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी झाला. सरपंच लिंबाबाई खडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, लातूर तालुका अध्यक्ष बंन्सी भिसे, सोमनाथआप्पा पावले, विजय काळे, पद्माकर चिंचोलकर, गुणवंत कारंडे, बालाजी शिंदे, फुलचंद अंधारे, महादेव मुळे, राजकिरण साठे, उद्धव काळे, महादेव गुरुशेटे, अच्युत इरपे, श्रीनाथ बंडगर, दत्तगिरी पवार, बालाजी साळुंखे, श्रीपती आळणे, सुधीर मोहिते यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

देशाच्या पंतप्रधान पदाची नरेंद्रजी मोदी यांनी सुत्रे हाती घेतल्यापासून भारत देशाने सर्वांगीन विकासात उंची गाठली आहे. सामान्यांसाठी सुरु केलेल्या विविध योजनांचा लाभ देताना जात, धर्म पाहीला नाही सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भादा सर्कल मधील गावागावात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून अनेक गावचे रस्ते – पूल, पाणीपुरवठा योजना, नॅशनल हायवे, पंतप्रधान ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, धार्मिक स्थळांचा विकास, सभागृह यासह विविध सार्वजनिक विकासाबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजनेचा मोठ्या प्रमाणात गोरगरीब आणि गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचे आणि मतदार संघातील (पान ३ वर)...

# स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने !

## संपादकीय...

भारत स्वतंत्र झाला. इंग्रज आणी मोगलाईच्या जोखंडातून भारत मूक्त झाला. विविध जाती, धर्माच्या भारतावर इंग्रज आणी मोगलाचे राज्य होते. प्रारंभीच्या काळात झांशीच्या राणी लक्ष्मीबाईनी इंग्रज चले जाव असा नारा दिला होता. परंतू सुभाषचंद्र बोस याच्या विचारधारणेतील फरकामूळे ते एकत्र येवू शकले नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज यानी सकल मराठा समाज एकत्र करण्यासाठी लढा दिला त्यात मुस्लिम, निजामविरोधी संघर्ष केला परंतू शिवाजी महाराज यानी स्वतंत्र भारतासाठी कांही तरी केले असा इतिहासात उल्लेख नसला तरी आजघडीला छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेवून मराठा आरक्षण देण्यासाठीची घोषणा केलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणी मराठा आरक्षण नकोच ही भुमिका घेणारे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बचावाची भुमिका घेवून बसले असले तरी महाराष्ट्राचा राष्टवादीचा बूलंद आवाज असलेले अजित पवार यांची बोलती बंद झाल्याने भारतीय स्वातंत्र्य दिन कसा साजरा होतो हे विरोधकाचे धोरण विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे संपूष्टात आणून स्वतंत्र भारताचा ७७ व्या वर्धापन दिन करसा करतील याकडेच सर्वसामान्य जनतेचे लक्ष्य वेधून राहील्याचे दिसते आहे. कारण स्वतंत्र भारताचा १५ ऑगस्ट हा दिवस सर्वकस तोलामोलाचा असतो हे वैशिष्टये आहे त्यात तडजोड नाहीच.

भारत देश कसा स्वतंत्र झाला त्यासाठी कोणी बलीदान दिले कोणी योगदान दिले त्यापेक्षा कोण-कोणी स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यांची चर्चा न करता त्याना अभिवादन करण्याची क्षमता नसतानाही सरकारी आदेशानुसार आपण सर्वजन स्वतांत्र्यदिन साजरा करीतच असतो ती आपली स्वंय आहे कर्तव्य नाही अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे त्याचे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहातो.

मोदीपर्वात तर व्यक्ती स्वातंत्र्य अभिव्यक्ती स्वातंत्र्य, प्रसारमाध्यमे वगैरे बंदीस्थच आहेत त्यामूळे आम्ही आमचे पालकमंत्री असलेले भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर आक्षेप घेवू शकत नाही परंतू स्वातंत्र्य म्हणजे काय हे तरी मोदीजीनी उलगडून सांगावे अशी लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे कारण स्वातंत्र्य म्हणजे कोणा काढवीचे नाव आहे असा सवाल करणारे नामदेव ढसाळ आज हयात नाहीत किंवा त्यांच्या धाडसाचे कौतूक करणारे कवी अट्टलबिहारी बाजपेयी हे ही जगतात नसून ते स्वर्गवासी, वैकूंठवासी झाले असतील परंतू आजघडीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, फडणवीस,शिंदे, पवार हे काही तरी स्वातंत्र्यत्वाचा उलगडा करतील काय हीच लोकभावना व्यक्त होते आहे.

# चला.. साजरा करुया.. पर्यावरणपूरक गणेशोत्सव.. ! वृषाली पाटील

गणेशोत्सवाची लगबग आता लवकरच सुरु होईल आणि वातावरणात चैतन्य, उत्साह पसरेल.. शासन आणि संबंधित जिल्ह्याच्या प्रशासनाच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रम राबवण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. पुरोगामी विचारांचा जिल्हा असणारा कोल्हापूर जिल्हा या उपक्रमात अग्रेसर आहे. आपण सर्वजणही शाडू अथवा मातीच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना, कृत्रिम कुंडात मुर्ती विसर्जन, मिरवणूकीत पारंपरिक वाद्यांवर भर, लोककला व शिवकालीन साहसी कलांच्या सादरीकरणातून या कलेला चालना, डॉल्बीचा मर्यादित आवाज ठेवून खऱ्या अर्थानं पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करुया आणि आपल्या आरोग्याचं आणि पर्यावरणाचं रक्षण करुया.. !

शाडू व मातीच्या गणेश मूर्तीवर भर

सध्या बहुतांश गणेश मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) पासून बनवल्या जातात. तसेच या मूर्तीना सजवण्यासाठी हानिकारक ठरणारे रंग वापरले जातात. या मूर्तीचे पाण्यात विसर्जन केले तरी त्या पाण्यात पूर्णपणे विरघळत नाहीत. त्यामुळे जल, वायू प्रदुषणात भर पडते. म्हणूनच शाडू अथवा मातीच्या गणेश मूर्ती बसवण्यावर भर देणे गरजेचे आहे.

पारंपरिक वाद्यांचा वापर

विविध भागांतील लोकनृत्य, कलापथक व पारंपरिक वाद्यं ही आपल्या देशाची खरी ओळख आहे. कोणत्याही मोठ्या सण समारंभात ढोल, ताशा, हलगी, झांज, लेझीम तसेच तलवारबाजी, दांडपट्टा, मर्दानी खेळ अशा शिवकालीन साहसी कला प्रकारांना चालना देणे आवश्यक आहे. यासाठी गणेशोत्सव व मिरवणुकीदरम्यानही लोकनृत्य व पारंपरिक वाद्यांच्या सादरीकरणावर भर देणे आवश्यक आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्य शासनाचे प्रयत्न

राज्य शासनाच्या वतीने राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देवून गौरवले जाते. मागील वर्षी राज्यस्तरीय पहिल्या क्रमांकाच्या मंडळाला ५ लाख, द्वितीय क्रमांकास २ लाख ५० हजार, तर तृतीय क्रमांकास १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवले होते. तर उर्वरित उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील

जिल्ह्यात सन २०१५ पासून पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून सन २०१५ ते २०२३ या नऊ वर्षात या उपक्रमाला येथील नागरिकांनी खूप चांगला प्रतिसाद दिला आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रमात जिल्ह्यातील सर्व कुटुंबांनी सहभागी होण्यासाठी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका व नगरपरिषदांमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. हा उपक्रम अत्यंत नियोजनद्ध पध्दतीने यशस्वी होण्यासाठी तसेच जिल्ह्यातील नदी, तलाव, पिण्याच्या पाण्याच्या विहिरी अशा सार्वजनिक जलस्त्रोतांचे प्रदूषण होवू नये, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, जिल्हाधिकारी अमोल येडगे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी नियोजन केले आहे.

जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, पोलीस अधीक्षक, पर्यावरण विभागाचे अधिकारी व तज्ज्ञांसमवेत जिल्ह्यातील गणेश मंडळांच्या प्रमुखांची बैठक घेऊन जनजागृतीवर भर देण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रमात कोल्हापूर जिल्हा राज्यात व देशात अग्रेसर राहण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येडगे यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनीही सर्व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रमासाठी चोख नियोजन केले आहे. या उपक्रमात अधिकाधिक कुटुंबे सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सरपंच, ग्रामपंचायतींना आवाहन करण्यात येत आहे.

गावामध्ये 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेनुसार सार्वजनिक गणेशमुर्तीची प्रतिष्ठापना करणे, घरगुती गणेशमुर्तीची प्रतिष्ठापना करताना धातू, संगमरवरी, इतर पर्यायी किंवा मातीच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करणे तसेच घरगुती गणेशमुर्तीचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी किंवा नजिकच्या कृत्रिम तलाव, कुंड अशा कृत्रिम विसर्जनस्थळी करण्याबाबत गावस्तरावर प्रबोधन, गावनिहाय मूर्ती संकलन व विसर्जन, फेर विसर्जनासाठी दिलेल्या मूर्ती



मूर्तीकारांकडे परत देण्यासाठी गावस्तरावर यादी करणे, निर्माल्य संकलन, वाहतूक व्यवस्था व त्याचे सुयोग्य व्यवस्थापन याबाबत आशा, अंगणवाडी सेविका, शालेय विद्यार्थ्यांमार्फत जनजागृती करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे जिल्हा स्तरावरुन सनियंत्रण करण्यात येणार आहे.

पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी मागील वर्षी जिल्ह्यात एकूण १ हजार १२२ जुन्या विहीरी, खणी निश्चित करण्यात आल्या होत्या. तर एकूण ९७७ काहिली, कृत्रिम तलाव, मोठी भांडी अशी पर्यायी व्यवस्था केली होती. तसेच मुर्ती परत घेण्यासाठी ३०० मुर्तीकार होते. निर्माल्य संकलनासाठी १ हजार ३२१ ट्रॉली व १८८ घंटागाडी ठेवण्यात आल्या होत्या.

सन २०२३ मध्ये ४ लाख ६७ हजार गणेशमूर्ती संकलित करुन त्या जलस्त्रोतात विसर्जित न करता पर्यायी विसर्जन कुंड तयार करुन श्रद्धापूर्वक विसर्जित केल्या गेल्या. नदी प्रदुषण टाळण्यासाठी नदीमध्ये मूर्ती विसर्जन करणे टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रमोद माने यांनी केले आहे.

फटाक्यांचा अतिरेक टाळूया

फटाक्यांमधील हानिकारक वायू आणि विषारी पदार्थ वातावरणात मिसळले गेल्यामुळे वायू आणि ध्वनी प्रदूषणात वाढ होवून आरोग्याला धोका पोहोचू शकतो. यासाठी सर्वच सार्वजनिक सण, समारंभांमध्ये फटाक्यांचा अतिरेक टाळणे आवश्यक आहे.

आवाजाची पातळी मर्यादित ठेवूया

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागामार्फत सन २०२३ मधील गणेशोत्सवादरम्यान कोल्हापूर शहरातील २२ ठिकाणच्या आवाजाची मोजमाप चाचणी केली होती. यामध्ये कोल्हापूर शहरातील सर्वच ठिकाणी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सेंट्रल पोल्युशन कंट्रोल बोर्ड) ने घालून दिलेल्या मानांकनापेक्षा जास्त मर्यादा ओलांडण्यात आल्याचे दिसून आले. शैक्षणिक परिसर, रुग्णालये, न्यायालयाच्या आसपासच्या शांतता क्षेत्रातही आवाजाची पातळी प्रमाणापेक्षा कित्येक पटीने जास्त असल्याचे संशोधनातून आढळून आले.

रहिवासी क्षेत्रात रात्रीच्या वेळी ४५ डेसिबलच्या आसपास आवाजाची पातळी असणे आवश्यक असते. मात्र अनंत चतुर्दशी दिवशी झालेल्या मिरवणुकीदरम्यान शहरातील बहुतांशी भागात ७६ ते ७८ डेसिबल आवाजाची नोंद झाली होती. मिरवणूक मार्गावर रात्रीच्या वेळी १०२ डेसिबल म्हणजे साधारण दुप्पटीच्या आसपास आवाजाची नोंद झाली असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या विभाग प्रमुख आसावरी जाधव यांनी दिली आहे. आरोग्याच्या हितासाठी सण, समारंभ, मिरवणुकांदरम्यान आवाजाची पातळी मर्यादित ठेवणे गरजेचे आहे.

पर्यावरण स्नेही कृतीची गरज

गणेशोत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात होणारे जलस्त्रोतांचे प्रदूषण आणि गाळाचे प्रमाण अधिक होऊन उद्भवणारा पुराचा धोका, फटाके आणि ध्वनीक्षेपकांनी मर्यादा ओलांडल्यामुळे झालेले हवेचे आणि आवाजाचे प्रदूषण हे मानवाला विशेषतः वृद्ध, गर्भवती आणि लहान मुलांना आघात पोहचविणारे आहे. लोकांनी याबाबत सजगपणे बदल स्वीकारुन पर्यावरण स्नेही कृती केली पाहिजे. तरच पर्यावरण टिकून राहण्यास मदत होईल, असे आवाहन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांनी केले आहे.

चांगल्या आरोग्यासाठी खबरदारी घेवूया

सर्वसाधारणपणे आपण ५० डेसिबलपर्यंतचा आवाज अर्धा ते एक तासापर्यंत सहन करु शकतो त्याहून अधिक आवाज अर्ध्या तासापेक्षा जास्त ऐकावा लागला तर डोके दुखणे, डोके जड येणे अशा स्वरुपाचा त्रास होऊ शकतो. तर त्याहून जास्त पातळीचा आवाज तीन मिनिटांहून अधिक काळ सलग ऐकावा लागला तर कोणत्याही व्यक्तीच्या हृदयाचे ठोके वाढू लागतात. तसेच शरीराचे ब्लड सर्क्युलेशन गतीने होते. यामुळे उच्च रक्तदाब (ब्लड प्रेशर) जडतो. त्याचबरोबर ब्लड प्रेशर मध्ये चढ-उतार होऊन हृदय, मेंदू व शरीराच्या कोणत्याही भागाला इजा पोहोचू शकते. १३० हुन अधिक डेसिबल आवाजामुळे कान, डोके सुन्न होणे, चक्कर येऊन शुद्ध हरपून जाणे मेंदूत रक्तस्त्राव (ब्रेन हॅमरेज) होऊ होवू शकतो. तसेच कानाचे पडदे फाटून कायमस्वरूपी बहिरत्व येऊ शकते. हृदयात धडधड, हार्ट फेल्युअर कायमचा हृदयविकार किंवा हार्ट अटॅक येऊ शकतो.

सर्वसाधारणपणे ७० डेसिबल होऊन अधिक आवाजाच्या पातळीतील डॉल्बी स्टेरिओचा आवाज धोकादायक ठरु शकतो. त्यातही बंद सभागृहातील स्पीकर्स डॉल्बी साउंड अधिक धोकादायक ठरतात. सार्वजनिक ठिकाणी सुद्धा रात्रीच्या शांत वातावरणात ७० हून अधिक डेसिबल आवाज अत्यंत हानिकारक ठरु शकतो. लहान बालके, गरोदर माता, ज्येष्ठ नागरिक, हृदय रुग्ण, पॅरालिसीसचे रुग्ण व मनोरुग्णांना ६० डेसिबलहून अधिक आवाजाची पातळी धोकादायक ठरण्याबरोबरच आजार वाढवणारी ठरु शकते. गरोदर मातांच्या पोटातील बाळाच्या अवयवांना धोका पोहोचून वाढीवर परिणाम होऊ शकतो तसेच प्री मॅच्युअर डिलिव्हरी होऊ शकते, अशी माहिती छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय (सीपीआर) मधील हृदय चिकित्सा विभाग (कार्डीओलॉजी) विभागाचे प्रमुख डॉ.अक्षय बाफना यांनी दिली आहे.

कान, डोळ्यांची काळजी घ्या

हल्ली सण, समारंभादरम्यान डॉल्बी स्टेरिओच्या आवाजाची पातळी ९० ते १०० डेसिबलपेक्षाही अधिक असते. यामुळे कानाच्या पडद्याला छिद्र पडू शकते तसेच पडद्याच्या आतील हाडांच्या साखळीला किंवा अंतरकर्णातील वाहिन्यांना धोका पोहोचू शकतो. यामुळे तात्पुरते किंवा कायमचे बहिरत्व येऊ शकते. यासाठी डॉल्बी स्टेरिओचा आवाज शक्यतो ८० डेसिबल पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपण स्पीकरच्या समोर उभे राहणे टाळणे आवश्यक आहे. तसेच लेझर लाईटमुळे दृष्टी कमी होण्याचा किंवा गमावण्याचा धोका होऊ शकतो. म्हणूनच लेझर लाईट डोळ्यावर पडणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे, असे आवाहन छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय (सीपीआर) मधील कान, नाक, घसा विभागाचे प्रमुख डॉ. अजित लोकरे यांनी दिली आहे.

गणेश मंडळांमार्फत सामाजिक प्रबोधनाला प्राधान्य देऊया

गणेशोत्सव, नवरात्र तसेच महापुरुषांच्या जयंतीनिमित्त घेण्यात येणाऱ्या उत्सवातून महापुरुषांचे विचार व त्यांच्या कार्याचा तसेच सामाजिक प्रबोधनपर विषयांचा प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. गणेशोत्सवानिमित्त केलेले देखावे पाहण्यासाठी हजारो नागरिक गणेश मंडळांना भेटी देतात. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गणेश मंडळे देखाव्यांमधून झाडे लावा झाडे जगवा, प्लास्टिक बंदी, सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, पाण्याची बचत अशा पर्यावरण रक्षण तसेच सामाजिक एकात्मता, महिला सक्षमीकरण, महिला व बालकांचे कायदे, विधवा प्रथा बंदी, व्यसनमुक्ती, ऐतिहासिक, पुरातन वास्तु आणि गड किल्ल्यांचे जतन व संवर्धन अशा विषयांवर जनजागृती करताना तसेच ढोल ताशा सारख्या पारंपरिक वाद्यांचा वापर करत असल्याचे दिसते. परंतु, देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करणाऱ्या व उत्सवात पारंपरिक वाद्यांचा वापर करणाऱ्या मंडळांची संख्या वाढणे आवश्यक आहे. त्याचबरोबर देखावे तयार करताना पर्यावरणपूरक घटकांच्या वापरावर भर दिल्यास प्रदूषणही रोखले जाईल..

गणेशोत्सव हा अबाल, वृद्धांच्या आनंदाचा.. मांगल्याचा.. जल्लोषाचा सण.. या सणात पारंपरिक वाद्ये, लोककला व साहसी खेळांचे सादरीकरण होण्याबरोबरच सामाजिक प्रबोधनावर आधारीत देखाव्यांवर भर देवुया.. आणि हा सण मोठ्या उत्साहात.. भक्तीभाव, श्रद्धा, आत्मियता आणि आरोग्याची काळजी म्हणून पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करुया..!

# भारतीय स्वातंत्र्याची ७७ वर्ष

आज आपण आपल्या देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत. आजच्याच दिवशी ७७ वर्षापूर्वी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीतुन मुक्त झाला. त्यापूर्वी आपल्या देशावर इंग्रजांचे राज्य होते. व्यापारी म्हणून आलेले इंग्रज बघता बघता या देशाचे मालक बनले आणि कोट्यावधी भारतीयांना त्यांनी गुलाम बनवले. देश पारतंत्र्यात गेला.

सुमारे दीडशे वर्ष इंग्रजांनी आपल्या देशावर राज्य केले. तेवढ्या काळात त्यांनी आपला इतिहास, आपला पराक्रम आपला स्वाभिमान नष्ट करण्याचेच काम केले. ज्या देशात सोन्याचा धूर निघत होता त्या देशाला कंगाल करण्याचेच काम त्यांनी केले. देशातील नागरिकांना गुलामीची वागणूक दिली. गोरगरीब, सरळ साध्य मार्गाने जगणाऱ्या भारतातील नागरिकांवर त्यांनी अनन्वित अत्याचार केला. इंग्रजांच्या या अन्याय अत्याचाराने त्रस्त झालेल्या जनतेने इंग्रजांविरुद्ध पहिला उठाव केला तो १८५७ साली. दुर्दैवाने हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही तरी इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांना प्रेरणा देणारा हा उठाव ठरला. या उठावातूनच प्रेरणा घेऊन पुढे हजारो देशभक्त निर्माण झाले. काहींनी सशक्त क्रांतीने तर काहींनी अहिंसेच्या विधायक मार्गाने इंग्रजांशी लढा पुकारला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी हजारो क्रांतिकारांनी स्वतःचे रक्त सांडले, काही फासावर चढले तर काही इंग्रजांच्या गोळीने शहीद झाले. कित्येकांनी तुरुंगवास भोगला. काहींनी काळ्यापाण्याची तर काहींनी जन्मठेपेची शिक्षा भोगली. अशा कित्येक ज्ञात अज्ञात वीरांच्या बलिदानाने देश स्वातंत्र्य झाला.

१५ ऑगस्ट १९४७ ला रात्री १२ वाजता दिल्लीच्या लाल किल्यावर पंतप्रधान पंडित नेहरू यांनी तिरंगा फडकवला आणि देशात स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. देश स्वातंत्र्य होऊन आज ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करत आहोत. ७७ वर्ष हे कोणत्याही देशाचे मूल्यमापन करण्यासाठी तसा अतिशय कमी कालावधी पण इतक्या कमी कालावधीतही आपला देश जगातला सर्वाधिक प्रगत देश म्हणून ओळखला जात आहे. गेल्या ७७ वर्षात आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, समाजकारण अशा सर्वच क्षेत्रात भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. जो देश सुई ही बनवू शकत नाही असे मानले जात होते तो देश आज चंद्रावर स्वारी करत आहे. भारताने घेतलेली ही गरुड झेप कोणालाही हेवा वाटेल अशीच आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारतीय लोकशाहीकडे पाहिले जाते. देश स्वातंत्र होऊन ७७ वर्ष उमटली तरी आपल्या लोकशाहीला अजून कशाचेही गालबोट लागले नाही.

२६ जानेवारी १९५० पासून आपला देश प्रजासत्ताक बनला. भारताचे संविधान डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महान व्यक्तीने लिहिले. त्या संविधानानुसारच देशाचा कारभार चालू आहे. विविध, जाती, धर्म, पंथाचे लोक या देशात गुण्या गोविंदाने राहतात. प्रत्येक प्रांताची भाषा वेगळी, पेहराव वेगळा, संस्कृती वेगळी असे असले तरी भारतवासीय म्हणून सर्व एक आहोत हीच एकी आपली ओळख आहे. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या जाती, धर्माच्या १४५ कोटी लोकांना एकत्र बांधून ठेवण्याचे काम आपल्या संविधानाने केले आहे. म्हणूनच भारतीय संविधानाला जगातील सर्वोत्तम संविधान असे समजले जाते. भारतासोबतच स्वातंत्र्य झालेल्या आपल्या शेजारील राष्ट्राची आज काय अवस्था आहे हे आपण पाहतोच आहे. अवघ्या ७७ वर्षात भारत एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदयास आले.

जागतिक महासत्ता बनण्याकडे आपण पाऊले टाकत आहोत. प्रगतीची हीच घोडदौड अशीच चालू राहिली तर आगामी २३ वर्षात भारत जागतिक महासत्ता बनेल यात शंका नाही. देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या देशवासीयांना मनापासून शुभेच्छा! जय हिंद!! जय भारत!!!

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

## १६ ऑगस्ट रोजी 'स्वामुक्टा' संघटनेचा स्वारातीम विद्यापीठावर मोर्चा

लातूर : उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून भारतीय संविधानातील तरतुदींमध्ये घरगुती पद्धतीने बदल करून सुरु असलेल्या मनमानी कारभाराच्या विरोधात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने (एमफुक्टो) विविध कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत एमफुक्टो संलग्नित 'स्वामुक्टा' संघटनेचा जाहीर पाठींबा असून या आंदोलन कृतीचा भाग म्हणून 'स्वामुक्टा' संघटनेच्या वतीने दि. १६ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड येथे मुख्य प्रवेशद्वार ते प्रशासकीय इमारत असा मोर्चा काढून मा. कुलगुरू महोदयांना निवेदन दिले जाणार आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसुचनेची जशास तशी अंमलबजावणी करावी; एम.फिल व पीएच.डी करिता प्रोत्साहनपर वेतनवाढ सुरू ठेवावी, सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीचे लाभ हे पात्रता दिनांकापासून देणे; एम.फिल. धारक प्राध्यापकांना पदोन्नतीचे लाभ तात्काळ प्रदान करावेत; १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी; पूर्णवेळ प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी; नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या तारखेपासून सेवा ग्राह्य धरून जुनी पेन्शन योजनेचे लाभ देण्यात यावे; प्राध्यापकांना अनुज्ञेय असलेल्या सर्व प्रकारच्या रजा लागु करण्यात याव्यात; विद्यापीठ कायदा २०१६ यास अनुसरून एकरुप परिनियम लागु करावे आदि मागण्यांचा समावेश आहे.

या मोर्चाला संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जोगदंड, सचिव डॉ. विजय भोपाळे, (पान ४ वर)...

### गुंजोटी येथे आदिवासी महिलेच्या शेतात अवैध उत्खनन करून मुरुमाची विक्री

लातूर : भारतीय स्वातंत्र्याला



७५ वर्षे झाले तरी अद्याप दलित आदिवासी वरील अन्याय, अत्याचार थांबताना दिसत नाहीत. असाच एक आदिवासी महिलेवरील अन्यायाचा प्रकार अहमदपूर तालुक्यात उघडकीस आला आहे.

अहमदपूर तालूक्यातील गुंजोटी येथील वयोवृद्ध व विधवा आदिवासी महिलेच्या गट क्रमांक १६७ मधील अडीच एकर शेतजमिनीत गावातीलच चारजणांनी दंडमशाही करून शेतावर कब्जा करून तिथे अवैध उत्खनन करून लाखों रुपयांचा मुरुम विक्री करून जमिनीचे नुकसान करीत आहेत. शेतात खोदकाम करून मुरुम घेऊन जाऊ नका म्हटल्याने संबंधित लोक जीवे मारण्याची धमकी देत असल्याची तक्रार रुक्मिनबाई महादू कारलेवाड यांनी अहमदपूरचे तहसीलदार व किनगाव पोलीसात दिली आहे. सदर आदिवासी महिलेच्या पतीचे निधन झालेले असून तीस चार मुलीच आहेत. चारही मुलींचे लग्न झालेले असून त्या सासरी असतात. सदरची विधवा महिला तिच्या मालकीच्या शेत जमिनीत पिकवून आपला उदरनिर्वाह करीत असते. गावातील सुमनताई दगडू चावरे व त्यांची मुले राजू, बाळू, दादा हे गुंड प्रवृतीचे व बेकायदेशीर धंदे करणारे असून त्यांनी माझ्या शेतात अवैध व बळजबरीने खोदकाम करून लाखों रुपयांचा मुरूम विक्री करत आहेत. त्यांना मज्जाव केला असता जीवे मारण्याची धमकी देत आहेत. त्यामुळे मी गाव सोडून किनगाव येथे राहत असल्याचे रुक्मिणबाई कारलेवाड यांनी तक्रारीत म्हटले आहे.

### शिवलीच्या श्री हनुमान देवस्थानास ब दर्जा मिळवून देणार दुर्लक्षित भादा सर्कल महायुती शासनाच्या माध्यमातून विकासाच्या हायवेवर आणले दिशाभूल करणाऱ्या काँग्रेसवाल्यापासून सावध रहा आ. रमेशआप्पा कराड यांचे आव्हान ...

**(पान २ वरुन)**...तिनशेहून अधिक धार्मिक स्थळाचा जीर्णो द्धार करण्याचे भाग्य लाभले असल्याचे बोलून दाखविले.

केंद्र आणि राज्य शासनाने सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून अनेक जनहिताच्या योजना सुरू केल्या. कोट्यावधी रुपयाची तरतूद करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्यातील महायुती शासनाने सुरू करून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याचे घोषित करतात विरोधक खोटे आरोप करून संभ्रम निर्माण करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, नोटाच्या विरोधात निवडून आलेल्या काँग्रेसच्या आमदाराने पाच वर्षात काय दिवे लावले कोणती विकासाची कामे केली जनतेला जाहीर सांगावे. विधानपरिषदेचा आमदार झाल्यापासून तीन वर्षात मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत निधी देण्याचे काम केले. येणाऱ्या काळात होणाऱ्या निवडणुकीत जनतेनी गावा गावातील विकास कामासाठी, आपल्या प्रगतीसाठी महायुतीला साथ द्यावी असे आव्हान केले.

या कार्यक्रमात विक्रमकाका शिंदे, सोमनाथआप्पा पावले, पद्माकर चिंचोलकर, राजकिरण साठे यांनी आपले मनोगत व्यक्त करून दिलेला शब्द पाळणारे आ. रमेशआप्पा कराड हे एकमेव नेते आहेत. विकास निधी काय असतो हे भादा सर्कलमधील जनतेला त्यांच्यामुळेच समजले. येणाऱ्या काळात आ. रमेशआप्पा कराड यांच्या पाठीशी भक्कम ताकत उभी करण्याचा निर्धार या भागातील जनतेने केला आहे असे बोलून दाखवले.

या मेळाव्यास भादा सर्कल मधील प्रत्येक गावागावातील वाडीवस्तीतील भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते आ. कराड यांचे शिवली गावात आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात मोठ्या जल्लोषाच्या वातावरणात स्वागत करण्यात आले.

# लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त लातूर शहर व जिल्हाभरातील ३०० हॉस्पिटल्समध्ये महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : राज्याचे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी लातूर शहर व परीसरात विविध समाजउपयोगी उपक्रम घेण्यात आले. आयएमए, डेंटल, निमा, होमिओपॅथी असो. व व्हीडीएफ फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे जवळपास ३०० खासगी रुग्णालयात महाआरोग्य शिबिर आयोजीत करून मोफत व माफक दरात आरोग्य सेवा देण्यात आली. काही प्राथमिक आरोगय केंद्रातही हा उपक्रम घेण्यात आला. या महाआरोग्य शिबीरास सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरांच्या निमीत्ताने हजारो रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. रुग्णांना मोफत औषधींचेही वितरण करण्यात आले.

लातूर शहर व परीसरातील जवळपास सर्वच खासगी रुग्णालयात १४ ऑगस्ट २०२४ बुधवार रोजी सकाळी १०.०० वाजतापासून विलासराव देशमुख महाआरोग्य शिबीराची सुरुवात झाली. या ठिकाणी गरजु रुग्णांनाची मोफत तपासणी करण्यात येऊन बहुतांशी रुग्णांवर तातडीने प्राथमिक उपचारही करण्यात आले. महाआरोग्य शिबीरात साथीचे रोग, हृदयरोग, कॅन्सर आदींसारख्या खर्चीक आजारांचीही तपासणी व उपचार करण्यात आले.



या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील ६६ हॉस्पिटलसह ९० डॉक्टर्स तर जिल्हाभरातील एकूण ३०० पेक्षा अधिक हॉस्पिटल्सच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी आपआपल्या परिसरातील गरजू रुग्णांची सोय व्हावी, त्यांना योग्य ती उपचार यंत्रणा उपलब्ध करून देणे सुखकर व्हावे याकरिता शिबिराच्या आधीपासूनच रुग्णांना त्याविषयी सविस्तर माहिती देण्याचे काम केले आहे. शिबिराच्या आधी चार दिवस एखादा रुग्ण उपचारासाठी आला असेल व त्याचा उपचाराचा खर्च अधिक होत असेल तर लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञ डॉक्टर मंडळींनी अशा रुग्णांना मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले होते,

लातूर शहर व जिल्ह्यातील जवळपास सर्वच आजारांवर उपचार करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांनी या महाआरोग्य शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवला. या महाआरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, सचिव डॉ. गणेश बंदखडके, महाआरोग्य शिबीराचे शहर समन्वयक कल्याण बरमदे, डॉ. अशोक पोद्दार, ग्रामीण समन्वयक डॉ. दिनेश नवगीरे, डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.उत्तम देशमाने, डॉ. मुकेश आरडले, निमाचे अध्यक्ष डॉ. मनोज देशमुख, होमिओपॅथिक असो.चे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम दरक, महीला विभागातून डॉ. विमल डोळे, डॉ.क्रांती साबदे यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्वतोपरी परिश्रम घेतले.

# पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात १६५ रुग्णांची तपासणी

लातूर : दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १२ व्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण १६५ रुग्णांची तपासणी करण्यात आल्याची माहिती डॉ. अशोक पोद्दार यांनी दिली.

पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने सातत्याने अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. वर्षातून किमान सहा ते सात मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचे काम या हॉस्पिटलच्या माध्यमातून केले जाते, हे विशेष. आजचे हे शिबीर १४४ वे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे खा. डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अति.पोलीस अधिक्षक अजय देवरे,आयएमएचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे, डॉ. कल्याण बरमदे,डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. इमरान कुरेशी आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांनी लोकनेत्याच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. या सर्वांचे स्वागत पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ.अशोक पोद्दार यांनी केले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती आणि पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून नियमितपणे अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन केले जाते. या महान नेतृत्वामुळेच लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात अमुलाग्र क्रांती झाल्याच्या भावना वैद्यकीय समस्त डॉक्टरांकडून व्यक्त केली जाते. डॉ.अशोक पोद्दार यांनीच लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात अशा प्रकारच्या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचा नवा वैद्यकीय सेवा पॅटर्न कार्यान्वित करण्याकामी




पुढाकार घेतला, हे सर्वज्ञात आहे. आरोग्य तसेच सामाजिक क्षेत्रातही ते कायम कार्यरत असतात. रुग्णसेवा हीच ईश्र्वरसेवा हे ब्रीद खऱ्या अर्थाने जोपासण्याचे काम डॉ.अशोक पोद्दार आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने सातत्याने करत असतात.

यावेळी बोलताना खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी डॉ. पोद्दार यांनी मोफत आरोग्य विषयक शिबिराच्या आयोजनात सातत्य राखल्याबद्दल त्यांच्या कार्याचे कौतुक करुन आज समाजात वावरणाऱ्या प्रत्येक घटकातील नागरिकांना चांगल्यात चांगली आरोग्य सेवा मिळावी यासाठी डॉ. पोद्दार आपल्या सर्व सहकाऱ्यांसह प्रयत्नशील असतात, असे सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अशोक पोद्दार यांच्या मोफत आरोग्य शिबिराविषयी सर्वांना आकर्षण असल्याचे आपण ऐकून होतो. आज त्याची प्रत्यक्ष अनुभूती घेतल्याचे त्यांनी सांगितले. अति. पोलीस अधीक्षक अजय देवरे यांनी अशा प्रकारच्या आरोग्य विषयक शिबीरांचा आदर्श राज्य व देशभरातील डॉक्टरांनी घ्यायला हवा असे मत व्यक्त केले.डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी बोलताना अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व तपासणी शिबिरांच्या माध्यमातून दरवर्षी हजारो रुग्णांची सेवा करण्याची संधी आपणास मिळते,असे सांगितले. भविष्यातही आपल्या हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ज्या समाजात आपण वावरतो, त्या समाजाचे देणे लागतो. अशा प्रकारच्या शिबीराच्या माध्यमातून आपण समाज ऋणातून अंशतः उतराई होण्याचा प्रयत्न करतो, असेही त्यांनी सांगितले. यावेळी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या भाषणांच्या चित्रफित उपस्थितांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १२ व्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण १६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी १११ रुग्णांच्या हाडांची ठिसूळता तपासण्यात आली. ४९ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले. ३२ रुग्णांची रक्त तपासणी तर ९० रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व रुग्णांसाठी विविध औषधी कंपन्यांच्या मेडिकल रिप्रेझेंटिटीव्हनी उपलब्धतेनुसार ७ ते १० दिवसांची मोफत औषधे उपलब्ध करून दिली.

याप्रसंगी रामेश्र्वर सोमाणी, जितेंद्र बजाज, बालाप्रसाद सारडा, माजी उपमहापौर कैलास कांबळे, दिशा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष सारीका गांधी, सचिव अनुराधा अग्रवाल, प्रोजेक्ट चेअरमन अनुराधा सोमाणी व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ.इमरान कुरेशी , डॉ. पल्लवी जाधव, प्रशासकीय अधिकारी वसीम शेख यांसह हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी, मेडिकल रिप्रेझेंटिटीव्ह यांनी परिश्रम घेतले.

## उत्तर मुंबईतील रखडलेले प्रकल्प ,रस्ते कामे मार्गी लागणार केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांची ग्वाही

**मुंबई : मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा आणि एमएमआरडीए च्या अधिका-यांसोबत बुधवारी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये उत्तर मुंबई आणि मुंबईतील रखडलेले विविध प्रकल्प कामे मार्गी लावण्यासंदर्भात तसेच वाहतूक कोंडीचा प्रश्न्न सोडविण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी बुधवारी दिली. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आ. योगेश सागर, आ.मनीषा चौधरी, आ.सुनील राणे, भाजपा प्रदेश प्रवक्ता गणेश खणकर, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.**

श्री. गोयल यांनी सांगितले की,या बैठकीमध्ये कांदिवली येथे ३७ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्याबाबतचा प्रकल्प वेगाने मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या २०-२५ वर्षांपासून रखडलेल्या या राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रकल्पाचे काम मार्गी लावण्याचा मार्ग आजच्या बैठकीनंतर मोकळा झाला आहे. याठिकाणी भविष्यात आशियाई, राष्ट्रीय, राष्ट्रकुल आणि ऑलिम्पिक स्तरावरचे खेळाडू प्रशिक्षित केले जातील. या बैठकीत घेण्यात आलेल्या विविध निर्णयांमुळे मुंबईकरांचे जीवन सुखकर होणार आहे असेही श्री. गोयल यांनी नमूद केले.

श्री. गोयल यांनी सांगितले की उत्तर मुंबई आणि उर्वरित मुंबईमध्ये अर्धवट आणि रखडलेले विविध प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मिळून युद्धस्तरावर काम करत आहे.बोरिवली येथील बाळासाहेब ठाकरे उद्यान आणि प्रमोद महाजन क्रीडा संकुल यांच्या सर्वांगीण विकासासाठी विस्तृत चर्चा करून त्याबाबत अहवाल लवकरच सादर करून तेथे क्रीडा सुविधा केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खेळाडूंच्या उज्वल भविष्यासाठी असे प्रकल्प महत्वाचे असून ते पूर्ण करण्यासाठी वेगाने कामे सुरू आहेत अशी माहिती श्री. गोयल यांनी दिली.

कांदिवली येथील कौशल्य विकास केंद्र येत्या दोन महिन्यांत आणि शिंपोली येथील कौशल्य विकास केंद्र येत्या ६-८ महिन्यांत सेवेत रुजू होईल अशी ग्वाही श्री. गोयल यांनी दिली.या बहुविद्याशाखीय केंद्रांमुळे पालघरपर्यंतच्या रहिवाशांना लाभ होणार आहे. मुबईकरांची वाहतुकीची समस्या सोडवून जीवन सुखकर करण्यासाठी देखील प्रयत्न सुरु असल्याचे श्री. गोयल यांनी सांगितले. आकुर्ली पश्र्चिम द्रूतगति मार्गावरील अंडरपासचे काम रखडले होते त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या होती. मात्र बैठकीमध्ये एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी ते काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्र्वासन दिले आहे. वाहतूक समस्येवर तोडगा काढण्यासाठी टाटा कंपनीला वाहतूक व्यवस्थापन आराखडा बनवण्याची विनंती केली असल्याची माहिती श्री. गोयल यांनी दिली. सह पोलीस आयुक्तांशी चर्चा करून वाहतूक कोंडी होणा-या ठिकाणी अतिरिक्त वाहतूक पोलीस तैनात करण्याची विनंती करून एक सर्वसमावेशक योजना तातडीने आखली जाणार आहे. प्रत्येकाला हक्काचे घर देण्याच्या दिशेने रखडलेल्या गृह आणि पुनर्विकास प्रकल्पांबाबतही बैठकीत चर्चा झाली. प्रत्येक प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए) नोडल एजन्सी म्हणून नियंत्रण ठेवून कामे पूर्ण करून घेणार असल्याची माहितीही श्री. गोयल यांनी दिली. पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतील 'एक पेड मां के नाम' या योजनेनुसार उत्तर मुंबईमध्ये मुंबई महानगर पालिकेतर्फे एक लाख वृक्षांची लागवड केली जाणार आहे, असेही ते म्हणाले.

## लातूर जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये घेण्यात आली तिरंगा प्रतिज्ञा

लातूर दि.: हरघर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान



लातूर जिल्ह्यात मोठ्या उत्साहपूर्ण सुरू आहे. या अभियानांतर्गत आज जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ वाजून ११ मिनिटांनी तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी संबंधित कार्यालयाचे प्रमुख व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यात ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियानाअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ९ ऑगस्ट रोजी सकाळी तिरंगा यात्रेने या अभियानाला सुरुवात झाली. त्यानंतर निबंध स्पर्धा, तिरंगा रॅली, घरोघरी आणि कार्यालयांवर तिरंगा लावणे आदी उपक्रम आयोजित करण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अभियानांतर्गत १४ ऑगस्ट रोजी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांमध्ये तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. या उपक्रमामध्ये अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

## रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनची सारोळा जि.प. शाळेत सायकल बँक

लातूर/प्रतिनिधी: रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या



वतीने सारोळा जि.प. शाळेत सायकल बँक स्थापित करण्यात आली असून शाळेपासून दूर राहणाऱ्या मुलींना या सायकल देण्यात आल्या. रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या वर्ष २०२३-२४ च्या उड्ठ फंड मार्फत हा उपक्रम राबवण्यात आला.या अंतर्गत १० मुलींना सायकल दिल्या गेल्या. मुलींचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या सुस्थितीत शाळेकडे जमा करून घेऊन पुढील गरजु विद्यार्थिनींना देण्यात येणार आहेत. यापूर्वीही रोटरीकडून या शाळेला ग्रंथालयासाठी पुस्तके व कपाट देण्यात आले होते.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष चेतन पंढरीकर, प्रोजेक्ट चेअरमन किशोर दाताळ,माजी अध्यक्ष रवींद्र बनकर,सचिव गिरीश पेन्सलवार,सदस्य अमोल दाडगे व पवन मालपाणी सर यांची उपस्थिती होती. शिष्टमंडळाने शालेय परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले. रोटरीने केलेल्या या मदतीबद्दल शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीतर्फे पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद जाधव,चेअरमन संजय नाना पाटील,एरंडीचे तंटामुक्ती अध्यक्ष आकाश पाटील,ग्रापं. सदस्य गुरुलिंग स्वामी,लतीफ शेख व ग्रामस्थ उपस्थित होते. या शाळेतील शिक्षक महादेव शिंदे यांनी जागतिक अवयवदान दिनानिमित्त अवयव दानाचा संकल्प केला. याबद्दल रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

## चाकूरच्या केंद्रीय सुरक्षा दलाच्या वतीन हर घर तिरंगा उपक्रमास प्रतिसाद

चाकूर : हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत आज दि. १४ ऑगस्ट



२०२४ रोजी सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर येथे तिरंगा दौडला प्रशिक्षण केंद्राचे महानिरीक्षक कमांडर मदनपाल सिंह हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. यावेळी . इतर सर्व अधिकारी आणि अधीनस्थ अधिकारी देखील उपस्थित होते. यामध्ये सर्व श्रेणीतील १ हजार १२० जवान सहभागी झाले होते.

मोटार सायकल तिरंगा रॅलीला श्रीमती नविता शर्मा बावा, प्रमुख सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर आणि विनीत कुमार, महानिरीक्षक यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. या रॅलीमध्ये प्रशिक्षण केंद्रातील सर्व प्रकारच्या ७० मोटरसायकलस्वारांनी प्रशिक्षण केंद्राच्या मुख्य गेटपासून रॅलीसह प्रत्येक घरापर्यंत तिरंगा मोहीम जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेण्याचे काम केले. वाहनात देशभक्तीपर गीते वाजवून सर्व चाकूरवासीयांच्या मनात देशभक्तीचे रंग भरले गेले व या रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. इड- ने कौतुक केले.

श्रीमती नविता शर्मा, बावा मुख्याध्यापक सहाय्यक प्रशिक्षण केंद्र चाकूर यांनी ५ किमी तिरंगा यात्रा मार्चला हिरवा झेंडा दाखवला. ज्यामध्ये केंद्रीय विद्यालय चाकूरचे विद्यार्थी आणि शिक्षक देखील उत्साहाने सहभागी झाले होते. या उपक्रमाने सर्वांच्या मनात देशभक्तीची भावना ओतप्रोत भरल्याचे दिसून आले.

## सोमवारी श्री संतोषीमाता जन्मोत्सवाचे आयोजन

लातूर : प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही सोमवार,दि.१९ ऑगस्ट २०२४ रोजी श्री संतोषीमाता जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संतोषी माता जन्मोत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

हत्ते नगर,रोड नंबर ४ लातूर येथे गेली ३४ वर्षांपासून रक्षाबंधन/नारळी पौर्णिमेला श्री संतोषी माता जन्मोत्सव उत्साहाने साजरा करण्यात येत आहे, यावर्षी दि.१९ ऑगस्ट २०२४ रोजी श्री संतोषी माता जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. सकाळी १०.३० वाजता श्री संतोषामातेला मोहन महाराज खंडेलवाल यांच्या हस्ते अभिषेक करण्यात येणार आहे.दुपारी १२.३० वाजता संतोषी मातेची आरती केली जाणार आहे.दुपारी १ ते ३ या वेळात प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.भाविकांनी सहकार्य करावे तसेच जास्तीत जास्त भाविकांनी या जन्मोत्सव व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संतोषीमाता जन्मोत्सव समिती लातूरच्यावतीने करण्यात आले आहे.

**तिरंगा लहरा ..**

अभिमाने फडकतो
तिरंगा प्रत्येक घरा
स्पर्धा करे अस्मानी
ध्वज अति उंच धरा
अमृतमहोत्सव सजे
सांगता सण साजरा
जाणून घ्या नियमा
करता सलाम मुजरा
ध्वज संहिता जाणा
संविधान पहा जरा
अवमान चुका नको
उन्माद फुकामाजरा
जपा ध्वज अस्मिता
फोडू विखारी नजरा
ध्वज संचलन चाले
वेगळा असे नजारा
राष्ट्रगीतसमजून गा
आवाज का लाजरा
जयकार भारताचा
गर्जावा भला बुजरा
माझादेशमाझीमाती
प्रजवेलं उत्साहे धरा
वंदे मातरम् जयघोष
पवित्र करेलं अधरा
वसुधा वंदन सार्थक
अभिवादन चराचरा
शिलाफलक वीरांचा
शहीद ऋणांस स्मरा
२

**प्रगत भारत ..**

बलशाली हा भारत
करी विश्र्वाचे सारथ
विश्र्वास दृढ मनात
लोकशाही सुदृढरथ
अनुभवाचे बोल ते
इतिहास ये सांगत
पुर्वजआशीषसहीत
विज्ञानाची घे संगत
धावाया लागे आज
काल होतो रांगत
भारत केवढा प्रगत
पाहे तारांगण पंगत
राही जागृत जागत
ना होणारं फसगत
सापांशीखेळण्याची
कला आहे अवगत
एकला होतो चालत
डोळ्यां कुणा सलत
आम्ही निघालो पुढे
वाईट त्यांची हालत
अमृतवर्षानुभव असे
सततप्रयास भगिरत
शिखरे गाठतो प्रगत
दमदार चालेअविरत
जे जे करती संगत
शत्रुचेहीअसे स्वागत
इच्छामनी हीचं असे
प्रगत हो सारे जगत

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## त्यांच्या वाणीतून....

लाडकी बहीण, अन्नपूर्णा योजना, तीर्थ दर्शन, युवा कार्य प्रशिक्षण, बळीराजा वीज सवलत, वयोश्री योजना तसेच मुलींना उच्च शिक्षणासाठी शंभर टक्के शुल्क माफीचा निर्णय अशा योजना सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनेमुळे शेतकरी, कष्टकरी, महिला व युवकांच्या जीवनात आमुलाग्र बदल होणार असून यातील एकही योजना बंद होणार नाही.

**- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

## १६ ऑगस्ट रोजी 'स्वामुक्टा' संघटनेचा स्वारातीम विद्यापीठावर मोर्चा..

(पान २ वरुन)... कोषाध्यक्ष डॉ. दिलीप पाईकराव, उपाध्यक्ष डॉ. डी. एन. मोरे, डॉ. करूणा देशमुख, डॉ.विष्णू पवार, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. लक्ष्मण शिंदे हे मार्गदशन करणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील पूर्णवेळ व तासिका तत्वावर कार्यरत सर्व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन लातूर जिल्हा अध्यक्ष डॉ. जयद्रथ जाधव, सचिव डॉ.अमोल लाटे, कोषाध्यक्ष डॉ.डी. आर.भुरे, उपाध्यक्ष डॉ. गोपाळ मोघे, डॉ.रावसाहेब इंगळे, डॉ. मनोजकुमार सोमवंशी डॉ.क्रांती मोरे, डॉ. आर डी. खाकरे, डॉ. पांडुरंग मगर, डॉ. बालाजी सूर्यवंशी, डॉ. विजयकुमार सोनी यांनी केले आहे.

# केळे सरळ का येत नाही? जाणून या मागचे कारण

केळे हे आरोग्यदायी असून त्याचे अनेक फायदे आहेत. केळे प्रत्येक ऋतुमध्ये सहज अढळणारे फळ आहे. केळ्यामुध्ये फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. केळ्यामध्ये स्टार्च असल्याने शरीरातील रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते. तसेच पचनशक्ती देखील चांगली ठेवते. त्यामुळे डॉक्टर केळं खाण्याचा सल्ला देतात. दुसरीकडे केळ्याचं पौराणिक महत्त्व देखील आहे. पूजाविधीत केळ्याला महत्त्वाचे स्थान आहे. केळ्याची उत्पत्ती ४००० वर्षांपूर्वी मलेशियात झाल्याचे सांगितले जाते. मात्र केळे पाहिल्यानंतर तुम्हाला एक प्रश्न नक्कीच पडला असेल की, केळे वाकडे का असते? केळे कधीच सरळ नसते कारण यामागे एक खास कारण आहे. जर तुम्हाला माहिती नसेल तर जाणून घ्या यामागचे खास कारण....



केळ्याचे घड झाडाला लागतात. पहिल्यांदा फूल आलं की ते गळून केळी येण्यास सुरुवात होते. केळी एका मागोमाग एक वाढत जात आणि त्याचा आकार वाढण्यास सुरुवात होते. तसेच जमिनीच्या दिशेने घड वाढत जातो. पण सूर्यप्रकाश वरून येत असल्याने केळी वरच्या दिशेने वळण्यास सुरुवात होते. या प्रक्रियेला निगेटिव्ह जियोट्रोपिज्म (झाडाचं सूर्याकडे आकर्षित होणे) असे संबोधले जाते. यामुळे केळी सरळ वाढण्याऐवजी वाकडी होतात. केळ्यासारख सूर्यफुलाचे देखील आहे. निगेटीव्ह जियोट्रोपिज्ममुळे सूर्यप्रकाशाकडे खेचले जाते. सूर्य ज्या बाजूने असतो, त्या बाजून हे फुल फिरत राहते.

केळी तपकिरी का होतात?

तुम्हाला माहिती आहे का, की जगभरात ५० दशलक्ष टन केळी तपकिरी रंगाचे ठसे असल्यामुळे फेकल्या जातात. फ्लोरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी नुकत्याच केलेल्या संशोधनात केळीवरील या काळा आणि तपकिरी रंगाबद्दल गुपित उघड केलं आहे. शास्त्राज्ञनुसार केळीच्या सालीमध्ये इथिलीन गॅस असतो. त्यात असलेले क्लोरोफिल ते मोडून टाकते. केळीच्या हिरवटपणासाठी क्लोरोफिल जबाबदार आहे. केळीच्या सालीमध्ये इथिलीन वायूचे प्रमाण वाढतं आणि ते वातावरणातील ऑक्सिजनशी प्रतिक्रिया देत असल्याने त्याचा हिरवापणा कमी होतो. यासोबतच यामध्ये असलेल्या स्टार्चचे साखरेत रूपांतर होते. त्यामुळे केळीचा गोडवा वाढतो.

केळी कधी पिकू लागतात?

जेव्हा केळीमधून फक्त गॅस निघतो आणि त्यामुळेच केळी पिकू लागतात. त्यामुळे त्यात गोडवा वाढतो आणि काही दिवसांनी ते अधिक पिकते. केळीसोबत ठेवलेल्या बहुतांश फळांवर इथिलीन वायूचा परिणाम दिसून येतो. उदाहरणार्थ, सफरचंद केळीसोबत ठेवल्यानंतर काही तासांनंतर ते पिकलेले दिसतात आणि ते मऊ होऊ लागतात. त्याच वेळी, संत्री, लिंबू आणि बेरी ही अशी फळे आहेत ज्यांना इथेन गॅसचा प्रभाव पडत नाही. तसंच तुम्ही जर केळीच्या आजूबाजूला दुसरं फळ ठेवलेत, तर ते केळीमुळे पिकू लागतात. त्यामुळे शक्यतो इतर फळांसोबत केळी ठेऊ नका.

## उपदेशकथा

बंगाली साहित्यातील एक युगपुरुष मायकेल मधुसूदन दत्त हे एकदा पूर्व बंगालच्या पाटनगरीत एका शहरास गेले होते तेव्हा तेथील साहित्यप्रेमी युवकांनी त्यांना मानपत्र दिले. आता मानपत्रांची भाषा म्हणजे फुलोरा आलाच. त्या युवकांनी लिहिले होते, आपली विद्या, आपली बुद्धी, आपली प्रतिभा यांच्या तेजाने आम्ही साहित्यरसिक प्रफुल्लवदन झालो आहोत. फक्त एका गोष्टीचा विषाद वाटत होता. आम्ही ऐकले होते की, आपण इंग्रज झाला आहात. (कारण त्यांनी एका इंग्रज मडमेशी संसारही थाटला होता) पण आपल्या आचरणाने आणि आपल्या संभाषणाने आमची भीती अनाठायी असल्याचे सिद्ध झाले, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. मधुसूदन कवींनी उत्तरादाखल म्हटले, माझ्यासंबंधी तुम्हा मंडळींचा इतर कोणताही गैरसमज समजण्यासारखा आहे. मात्र मी 'साहेब' झालो आहे, असं म्हणणं अन्यायाचं ठरेल. विधात्यानंच इंग्रज होण्याच्या माझ्या मार्गात खीळ घालून ठेवली आहे. माझ्या बैठकीच्या खोलीत नि निजायच्या खोलीत, अशा दोन्ही ठिकाणी मी मोठे आरसे टांगून ठेवले आहेत. साहेब होण्याची इच्छा मनात उद्भवलीच तर मी आरशात मुखडा पाहतो. तेवढी मात्रा लागू पडते. मी शंभर टक्के बंगाली आहे. इतकंच नव्हे तर मी 'बांगाल' (पूर्व बंगाल निवासी) आहे. जेसोर (यशोहर) चा! .

कथा उपदेश : माणूस किती मोठा झाला तरी आपले पूर्वीचे स्थान विसरत नाही.

## (गुरु वचन) दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे हीच इश्वर सेवा

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख-सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या-बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

## फुलांच्या माध्यमातून विलासरावजींचे स्मरण युनिक डेकोरेटर्सची कलाकृती

लातूर : लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांची युनिक



डेकोरेटर्सच्या वतीने नैसर्गिक फुलांनी डेकोरेट केलेली फोटो फ्रेम युनिक डेकोरेटरचे प्रॉपरेटर अब्दुल गफूर, मोहम्मद अनस यांनी तयार केली आहे. स्मृतिस्थळी अभिवादन केल्यावर हा फुलांचा फोटो आदरणीय सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब, माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख साहेब आणि आमदार धीरज विलासराव देशमुख यांना देण्यात आला.

यावेळी या प्रतिमेचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी कौतुक केले. यावेळी पत्रकार व्यंकटेश नरसिंगे, सिंकदर पटेल आदी उपस्थित होते.

## बाभळगाव महाविद्यालयात लोकनेते विलासराव देशमुख यांचा स्मृतिदिन साजरा

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव



द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांचा स्मृतिदिन सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला.

या निमित्ताने प्रारंभी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते आदरणीय साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अंगद कोते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दशरथ भिसे, स्टाफ सचिव डॉ.जयदेवी पवार, डॉ. रणजित जाधव, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ.अजित भांजी, डॉ.मा. ना. गायकवाड, डॉ. महावीर कटके, डॉ. वैशाली माढेकर, डॉ. मीनाक्षी कोंगे, प्रा. नंदा खरटमल, प्रा. बालिका गौंड, डॉ.अभिजीत बादाडे, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ पांडुरंग मुंढे, प्रा. पवार, प्रा. संदिपान चेवले, प्रा. हरिहर गायके, प्रा तानाजी सगर, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. सुरेश बिराजदार, प्रा. विवेक कदम, प्रा. संतोष कल्याणकर, प्रा. महारुद्र बिडवे, बाळासाहेब देशमुख, वसंत मस्के, विठ्ठल मुळे, प्रकाश मेहकर, हनमंत शिंदे, राजकुमार कांबळे, अंकुश थडकर, दत्ता फुलगामे, नितीन पाटील, बालाजी देशमुख यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. अभिवादानाच्यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौरवशाली इतिहास जाणून घेण्यासाठी सुरु होतेय भ्रमंती ऐतिहासिक स्थळांची...!

लातूर, (जिमाका) : १६ ऑगस्ट हा लातूर जिल्ह्याचा स्थापना दिवस. या दिवसाचे औचित्य साधून लातूर जिल्ह्यातील इतिहास प्रेमी नागरिक, इतिहास अभ्यासक आणि जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'लातूर हेरिटेज वॉक' हा अभिनव उपक्रम सुरु करण्यात येत आहे. ऐतिहासिक गंजगोलाई येथून या उपक्रमाला १६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ६.३० वाजता सुरुवात होणार आहे.




लातूर जिल्ह्याच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या वारसा स्थळांची माहिती नव्या पिढीला व्हावी, यामाध्यमातून त्यांच्यामध्ये या वारसा स्थळांबाबत जागृती होवून संवर्धनाची भावना वाढावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'लातूर हेरिटेज वॉक'च्या माध्यमातून प्रत्येक महिन्याला एका वारसास्थळी भ्रमंतीचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात सहभागी होणारे विद्यार्थी, नागरिक यांना संबंधित वारसा स्थळाचा संपूर्ण इतिहास जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील नामवंत इतिहास अभ्यासक या ऐतिहासिक स्थळांचा इतिहास उलघडणार आहेत.

आपल्या जिल्ह्यातील वारसास्थळे आणि त्यांच्याशी निगडीत वैभवशाली इतिहास जाणून घेण्यासाठी जिल्ह्यातील विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी 'लातूर हेरिटेज वॉक'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन इतिहास अभ्यासक, इतिहास प्रेमी नागरीक आणि लातूर जिल्हा प्रशासाच्यावतीने करण्यात आले आहे.

## राशी भविष्य १५ ऑगस्ट २०२४

मेष : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पूर्व

महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. आरोग्य चांगले राहील.

वृषभ : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम

आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

मिथुन:शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व

आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

कर्क : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम

उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल. जोखमीचे कामे शक्यतो आज करू नका.

सिंह : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण

आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

कन्या : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम

जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील.

तुळ : शुभ रंग :निळा, शुभ दिशा :पश्चिम

केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तु विकत घेण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

वृश्चिक : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व

आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. प्रिय व्यक्तिची भेट होण्याचे योग आहेत.

धनु: शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व

चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या. मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

मकर : शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण

मनोधर्ये वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

कुंभ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा :पूर्व

जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्ते बाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

मीन : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम

आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

## इतिहासात आजचा दिवस १५ ऑगस्ट

अंतरराष्ट्रीय

१०५७ – लुम्फानानच्या लढाईत स्कॉटलंडचा राजा मॅकबेथचा अंत.

१२६१ – मायकेल आठवा पॅलियोलोगस बायझेन्टाईन स्म्राटपदी.

१५१९ – पनामा सिटी शहराची स्थापना.

१५३७ – ऍसन्शन शहराची स्थापना.

१५४० – पेरूतील अरेकिपा शहराची स्थापना.

१६०९ – इंग्लंडच्या साउथॅम्टनहून मेफ्लॉवर जहाजात ईंग्लिश प्रवासी निघाले. अमेरिकेत कायमस्वरूपी युरोपियन वसाहत निर्माण करणारी ही पहिली टोळी होती.

१८२४ – अमेरिकेतील गुलामगिरीपासून सुटका झालेल्या व्यक्तींनी लायबेरिया हे राष्ट्र निर्माण केले.

१८७७ – थॉमस अल्वा एडिसनने सर्वप्रथम ध्वनिमुद्रण मेरी हॅड अ लिटल लॅम्ब या बालकवितेचे केले.

१९१४ – पॅसिफिक व अॅटलांटिक महासागराला जोडणारा पनामा कालवा अधिकृतपणे सुरू झाला.

१९२० – पोलिश-सोवियेत युद्ध-वॉर्सोची लढाई – सोवियेत संघाचा पराभव.

१९४४ – दुसरे महायुद्ध – दोस्त राष्ट्रांचे सैनिक फ्रांसच्या दक्षिण भागात उतरले.

१९४५ – दुसरे महायुद्ध – जपानने शरणागती पत्करली.

१९४७ – भारताला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.

१९४७ – मोहम्मद अली जिन्ना पाकिस्तानच्या गव्हर्नर-जनरलपदी.

१९४८ – दक्षिण कोरियाची निर्मिती.

१९६० – काँगोला फ्रांसपासून स्वातंत्र्य.

१९७१ – अमेरिकेने आपल्या चलन डॉलरचे सोन्याशी असलेले संधान खंडित केले.

१९७१ – बहरैनला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.

१९७५ – बांगलादेशमध्ये लश्करी उठाव. शेख मुजिबुर रहमान व कुटुंबियांची हत्या.

१९९९ – अल्जिरीयात दहशतवाद्यांनी २९ लोकांना ठार मारले.

राष्ट्रीय

१९४७ – भारतावर राज्य करणे ब्रिटिशांना अशक्य झाल्यामुळे लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या हस्ते भारताला स्वातंत्र्य देण्यात आले.

१६७२ – छत्रपती शिवाजीमहाराजांचा खांदेरी घेण्याचा प्रयत्न फसला. पुढे १६७५च्या ऑगस्ट महिन्यातच ते यशस्वी झाला.

१८८६ – सुप्रसिद्ध सिद्धपुरुष रामकृष्ण परमहंस यांनी समाधी घेतली.

१९०६ – वा.गो. आपटे यांच्या 'आनंद' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.

१९२७ – काकोरी कटाचे सूत्रधार रामप्रसाद बिस्मिल यांना फाशी.

१९६५ – डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय सरकारी दूरचित्रवाणी-दूरदर्शनचे उद्घाटन केले.

जन्म

१००१ – डंकन पहिला, स्कॉटलंडचा राजा.

१७६९ – नेपोलियन बोनापार्ट, फ्रांसचा स्म्राट.

१८७२ – योगी अरविंद बाबू घोष, आधुनिक भारताच्या स्वातंत्र्यचळवळीतील थोर क्रांतिकारक व तत्त्वचिंतक.

१८१३ – जुल्स ग्रेव्ही, फ्रांसचा राष्ट्राध्यक्ष.

१८७२ – श्री ऑरोबिंदो, भारतीय तत्त्वज्ञानी.

१८८६ – बिल व्हिटली, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894